Indexed Journal with
www.sjifactor.com
Impact Factor
7.264 (2021)

ISSN 2278-3199

Volume - 11, Issue - 01, January - June, 2022

*A Half Yearly Peer Reviewed Multidisciplinary Indexed National Research Journal of Social Sciences & Humanities...*

National Journal on ...

# SOCIAL ISSUES AND PROBLEMS



Gondia Education Society's

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE & SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA-411001

Volume – 11, Issue – 01, January - June, 2022/ ISSN 2278-3199/ **Impact Factor – 7.264**

- CONTENTS -



| | Title of Paper | Author Name | Page |
|---|---|---|---|
| 1. | Discrimination against Elected Dalit Panchayat Leaders | Ramesh H. Makwana | ...1 |
| 2. | Identity Politics and Tribal Autonomy Movement in Assam | Anjan Jyoti Borah | ...6 |
| 3. | Religion and Violence in India | Jayant C, Ghatage | ...11 |
| 4. | Noise Pollution and Judicial Attitude | M. L. Dharmapurikar | ...17 |
| 5. | Relevance of Dr. Ambedkar's Thoughts of Economic | R. G. Kumawat | ...22 |
| 6. | Poverty: On A Feministic Note | Aparna Sengar | ...25 |
| 7. | Women's: A Constitutional Insight and Legal Rights in India | Ranjana Bhimrao Ingole | ...30 |
| 8. | Impact of Covid-19 on Higher Education in India | Amrapali E. Bhiogade | ...33 |
| 9. | Educational Thoughts of Dr. Ambedkar and Its Relevance in | Archana Aher | ...37 |
| 10. | The Role and Contribution of Women In Indian Freedom | Ganesh M. Pathode | ...41 |
| 11. | Empowering Women Through Gender Sensitization | Sushma V. Bageshwar | ...44 |
| 12. | Understanding Role of India's Trade Policy in National | Sharad Kadam | ...47 |
| 13. | Employee Retention in Financial Institutions in Private Sector | Ranjana Pratik Ghode | ...51 |
| 14. | An Examination of Representation of Indian Women in Police | Shilpa Puranik | ...54 |
| 15. | Acid Attacks and Women in India | Chandrashekhar Malviya | ...57 |
| 16. | Illiteracy: A Social Problems | Surendra D. Pawar | ...61 |
| 17. | Problems of Geriatric People | Sunirmal Surendra Kabiraj | ...64 |
| 18. | Role of Radio in Social Enlightenment | Sudhakar L. Jadhav | ...67 |
| 19. | Library and Information Technology: A Vision | D. L. Thakare | ...69 |
| 20. | Problem of Handloom Small Scale Industries | Ajaykumar S. Mohobansi | ...72 |
| 21. | Myth and Animism: A Reading of the Animal Presence.... | Swati Madavi, Jayant Karmore | ...75 |
| 22. | बहुजन सामाजिक आंदोलन में मान. कांशीरामजी की भूमिका | कमलाकर पी. तागडे | ...78 |
| 23. | राष्ट्रीय शिक्षा नीति – २०२० | डी.एम. तिड़के, | ...82 |
| 24. | छात्रों की सामाजिक परिपक्वता एवं उनकी परोपकारी वृत्ती.... | शुभांगी डोंगरे | ...85 |
| 25. | तृणा मुकर्जी का 'आगाज' काव्यसंग्रह : अनुभूतियों का सहज उद्रेक | सुमेध पी. नागदेवे | ...88 |
| 26. | पोवाड्याने केलेले सामाजिक उत्थान | अनघा तेंडुलकर | ...90 |
| 27. | पाळीव प्राण्यांचे मानवीकरण : सामाजिक पैलू | वैशाली जोशी | ...94 |
| 28 | स्त्री अत्याचार : कारणे, परिणाम व ऊपाय | निसर्गध सिद्धार्थ | ...97 |
| 29. | महिला उद्धारक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर | नलिनी बोरकर | ...102 |
| 30. | कनिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सामाजिक परिपक्वता आणि...... | तिलक डी. भाडारकर | ...108 |
| 31. | कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ अधिनियम...... | ज्योती जी. नाकतोडे | ...111 |
| 32. | भारताचे नवीन शैक्षणिक धोरण : २०२० | संदिप रायबोले | ...114 |
| 33. | १८५७ च्या विद्रोहाची कारणे व महिलांचे योगदान | पी. आर. गौरकार | ...116 |
| 34. | नागझिरा वन्यजीव अभयारण्य: विदर्भाचे हिरवे फुफ्फुस | अल्का दुधबुरे, | ...119 |
| 35. | अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा | देवेन्द्र सोनटक्के, डी. एम. दुगकर | ...122 |
| 36. | आदिवासी महिलांचे कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवरील स्थान | प्रमोद चंद्रभान शेन्डे, | ...126 |
| 37. | भारतीय स्त्रिया आणि संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवी हक्क कायदा | अरविंद भवुतराव पाटील | ...129 |
| 38. | स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील स्त्रियांच्या सामाजिक चळवळी | विलास का. घाटुर्ले, | ...133 |
| 39. | बेरोजगारी : वर्तमानकाळातील एक भिषण समस्या | प्रियंका राजेंद्र आडे | ...137 |
| 40. | समाजीकरणात माहिती तंत्रज्ञानाची उपयोगिता | प्रकाश सुर्यभान सोनक | ...140 |
| 41. | सामाजिक समतेचे प्रणेते : संत गाडगेबाबा | आर. आर. दिपटे, | ...142 |
| 42. | सत्यशोधकी आणि आंबेडकरी जलसे | हेमंत म. देशमुख | ...145 |
| 43. | भारतीय महिलांचा राजकारणातील सहभाग | एस. एम. देवकर | ...147 |
| 44. | संशोधन रूपरेषा तयार करतांना | नवगणकर राजाभाउ | ...151 |



COLLEGE FOR GIRLS * PUNE-411001 * S. M.

# पाळीव प्राण्यांचे मानवीकरण : सामाजिक पैलू

*डॉ. वैशाली जोशी, सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सेंट मीरा महाविद्यालय, ६, कोरेगाव रोड, पुणे.४११००१*

***सारांश:*** *पाळीव प्राण्यांचे मानवीकरण करण्याचा कल दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. हा बदल फक्त पाळीव प्राणी सेवा उद्योगापुरता मर्यादित नसून याचा संबंध बदलत्या सामाजिक व्यवस्थेशी आहे. १९९० नंतरच्या दशकांमध्ये या उद्योगात झालेली लक्षणीय वाढ हा निव्वळ योगायोग निश्चित नाही. एका व्यापक सामाजिक बदलाचा हा एक भाग आहे. प्रस्तुत लेखात प्राण्यांच्या मानवीकरणाच्या सामाजिक पैलूंचा आढावा घेण्याचा तसेच या विषयाच्या समाजशास्त्रीय अध्ययनाचे महत्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. वेगाने वाढणारे शहरीकरण, विभक्त कुटुंब, एकेकट्या राहणाऱ्या व्यक्तींचे वाढते प्रमाण, जागतिक लोकसंख्येतील जेष्ठ नागरिकांचे लक्षणीय प्रमाण अशी ठळक वैशिष्ट्ये असणाऱ्या युगात माणसांच्या रिकाम्या जागा प्राणी भरून काढत आहेत. या बदलत्या सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भात प्राण्यांच्या मानवीकरणाचा अभ्यास होणे गरजेचे आहे.*

***मुख्य शब्द:*** *प्राण्यांचे मानवीकरण, पाळीव प्राणी सेवा उद्योग, सामाजिक व्यवस्था, सामाजिक विषमता.*

**प्रस्तावना:** पाळीव प्राण्यांचे मानवीकरण करण्याचा कल दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. हा बदल फक्त पाळीव प्राणी सेवा उद्योगापुरता मर्यादित नसून याचा संबंध बदलत्या सामाजिक व्यवस्थेशी आहे. प्रस्तुत लेखात पाळीव प्राण्यांच्या मानवीकरणाच्या सामाजिक पैलूंची चर्चा केली आहे. पाळीव प्राणी म्हणून जरी कुत्रा, मांजर, घोडा इथपासून ते कासव, मासे आणि पोपट अशा विविध प्र–वर्गातील पशु–पक्षी बाळगले जात असले तरी मानवीकरणाचे सर्वाधिक प्रमाण कुत्र्याच्या बाबतीत आढळते. त्यामुळे प्रस्तुत लेखदेखील कुत्रा या प्राण्याला मध्यवर्ती ठेवून लिहिला आहे.

'गलेलठ्ठ पाळीव श्वानावर 'अतिरिक्त चरबी काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वी' हि दि. १६ जून २०२१ ला दैनिक लोकसत्तामध्ये आलेली बातमी लक्षवेधी होती. या बातमीतील दोन मुद्दे महत्वाचे आहेत. पहिला म्हणजे पाळीव प्राण्यांमध्ये, विशेषत: कुत्र्यामध्ये वाढणारा लठ्ठपणा व त्यातून उद्‌भवणाऱ्या समस्या. दुसरा मुद्दा आहे कुत्र्याचे मालक ते पालक अशा आपल्या बदललेल्या सामाजिक भूमिकेचा. या दोन्ही मुद्द्यांच्या अनुषंगाने पाळीव प्राण्यांच्या वाढत्या मानवीकरणाकडे अधिक गांभीर्याने बघितले पाहिजे. हा प्रश्न मुलभूत हक्कांपासून हजारो माणस वंचित असताना पाळीव प्राण्यांसाठी सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. या विरोधाभासापुरता मर्यादित नाही. हा प्रश्न आहे माणसाला द्यायचा अग्रक्रम आपण प्राण्याला द्यायला का तयार झालो आहोत याचा.

राखणदार म्हणून पूर्वी दारात असणारा कुत्रा किंवा ठराविक वेळेला दूध प्यायला येणारे आणि बाकी सगळा दिवस बाहेर भटकणारे मांजर बघता बघता घरातल्या सोफ्यावर विराजमान झाले. पाळीव प्राण्यांचा, विशेषत: कुत्र्या–मांजराचा आपल्या जीवनातील आधुनिक स्वरूपातील वावर (प्राण्यांचे शो, विविध प्रजातींचे जाणीवपूर्वक केले जाणारे प्रजोत्पादन, गळ्यातील पट्टे आणि कॉलर ई.) साधारण १०० वर्ष जुना असला तरी गेल्या तीन दशकात जागतिक स्तरावर पाळीव प्राणी उद्योगाचे स्वरूप प्रचंड वेगाने बदलले आहे. युरोप, अमेरिका, आणि चीनमध्ये पाळीव प्राण्यांच्या संख्येत तसेच प्राण्यांशी संबंधित बाजारपेठीय उलाढालीत लक्षणीय वाढ झाली आहे.

आज भारतातही पाळीव प्राणी उद्योगाची वाढ झपाट्याने होत आहे. या क्षेत्रातील जागतिक बाजारपेठेतील खूप मोठा भागीदार होण्याची क्षमता भारतातील या उद्योगाला आहे असे म्हणले जाते. घरात पाळीव प्राणी असणाऱ्या लोकांची संख्या जसजशी वाढत आहे तसतशी पाळीव प्राण्यांना लागणारे खाद्य, प्रसाधने, औषधे, तसेच चेन, गळ्यातले पट्टे अशा प्राण्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या शोभिवंत वस्तूंची मागणी वाढते आहे. त्याच बरोबर प्राण्यांची हॉस्टेल्स, डे केयर सेंटर या सेवांचीही गरज भासू लागली आहे. प्राण्यांसाठीची खास सलून–स्पा अगदी हॉटेल्स देखील सुरु झाली आहेत. मांजरांसाठी समुपदेशन आणि कुत्र्यासाठी गाडी लागू नये म्हणून काढलेलं औषध इथपासून ते प्राण्यांसाठी तयार केलेले खास पोषणयुक्त अन्न आणि आरोग्य–विमा इथपर्यंत सर्व काही उपलब्ध आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत पशुवैद्यक दवाखाने, आणि काही ठराविक गरजेच्या गोष्टींची विक्री करणाऱ्या छोट्या दुकानांपुरत्या मर्यादित असणाऱ्या या उद्योगात आता कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत आहे.

१९९० नंतरच्या दशकांमध्ये या उद्योगात झालेली लक्षणीय वाढ हा निव्वळ योगायोग निश्चित नाही. एका व्यापक सामाजिक बदलाचा हा एक भाग आहे. प्रस्तुत लेखात प्राण्यांच्या मानवीकरणाच्या सामाजिक पैलूंचा आढावा घेण्याचा तसेच या विषयाच्या समाजशास्त्रीय अध्ययनाचे महत्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. पाळीव प्राण्यांचे मानवीकरण हा विषय 'प्राणी आणि मानवी समाज' या व्यापक आंतरविद्याशाखीय क्षेत्राशी निगडीत आहे. प्राणी आणि मानवी समाज या विषयाच्या अनुषंगाने आतापर्यंत झालेले बहुतांश संशोधन जीवशास्त्र, जैववैद्यकशास्त्र अशा विज्ञानांशी व औषधनिर्मिती, उपभोक्ता संस्कृती, मार्केट सर्वेक्षण अशा क्षेत्रांशी संबंधित आहे. सामाजिक शास्त्रांचा विचार केला तर मानसशास्त्र आणि इतिहास अशा मोजक्या ज्ञानशाखा वगळता अजूनही या विषयाकडे संशोधनाच्या दृष्टीने फार गांभीर्याने बघितले गेलेले नाही.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून केलेल्या संशोधनातून या विषयासंबंधी आकलनात मोलाची भर पडेल असे प्रतिपादन प्रस्तुत लेखात केले आहे. या लेखासाठी अन्वेषणात्मक दृष्टीकोनातून आतापर्यंत झालेल्या संशोधनाचा आढावा घेऊन प्राण्यांच्या मानवीकरणाचे सामाजिक पैलू अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. समाजशास्त्रात पुढील संशोधनाला दिशादर्शक होतील अशा मुद्द्यांची प्राथमिक चर्चा या लेखात केली आहे.

**पाळीव प्राण्यांचे मानवीकरण ही संकल्पना:** सर्वप्रथम पाळीव प्राण्यांचे मानवीकरण म्हणजे नक्की काय ते समजून घेतले पाहिजे.



ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS, POONA-411001

Principal Incharge
St. Mira's College for Girls, Pune.

पाळीव प्राण्यांकडे कुटुंबाचा एक भाग म्हणून पाहणे आणि त्यांचे संगोपन घरातील एखाद्या सदस्याप्रमाणे करणे एवढच नाही तर त्यासाठी आपण वापरतो त्या व तशाच गोष्टी आणि सेवा प्राण्यांसाठी वापरणे म्हणजे प्राण्यांचे मानवीकरण होय. मानवी भाव–भावनांचे व व्यवहारांचे रोपण प्राण्यांवर करणे हा या प्रक्रियेचा फार महत्वाचा भाग आहे. प्राण्यांना आपली भाषा समजते, ते आपल्या बोलण्याला प्रतिसाद देतात, त्यांना माणसाप्रमाणे संवेदना असतात अशी पक्की धारणा या मानवीकरणामागे आहे. हा बदल घडून येण्यात पाळीव प्राण्यांशी निगडीत बदलत्या समजधारनांची महत्वाची भूमिका आहे. या प्रक्रियेच्या सामाजिक पैलूंचा विचार करताना म्हणूनच प्राणी आणि समाज यांच्यातील सहसंबंधांच्या सामाजिक इतिहासाचा आढावा घेणे गरजेचे आहे.

**माणूस आणि प्राणी यांच्यातील सहसंबंधांचा सामाजिक इतिहास:** अगदी आदिम काळापासून प्राणी हे मानवी समाजाचा अविभाज्य घटक राहिले आहेत. वेगवेगळ्या गरजा भागविण्यासाठी मानवी समाजात पशुधनाचा वापर होत आला आहे. तसेच प्राण्यांच्या माणसाळण्याचा इतिहासही खूप प्राचीन आहे. लांडग्याच्या माणसाळण्यातून निर्माण झालेला कुत्रा नावाचा सहकारी अश्मयुगापासूनच माणसाच्या सोबत आहे. कुत्र्याचा मानवी समाजातील वावर घोडा, गाय–बैल, आणि शेळ्या मेंढ्याच्याही आधीपासूनचा आहे. प्राचीन काळापासून एक सवंगडी किंवा एक विरंगुळ्याचे साधन म्हणून पाळीव प्राण्यांचे स्थान माणसाच्या आयुष्यात दिसून आलेले आहे. प्राचीन इजिप्तच्या पुरातत्वीय अवशेषात दांडग्या कुत्र्याच्या प्रतिमा आढळतात. रोमन सम्राट अलेक्झांडरने पेरीता या आपल्या आवडत्या कुत्र्याच्या स्मरणार्थ एका शहराचे नामकरण केले होते अशी नोंद आहे. शुभ संकेत म्हणून सोनेरी मासा घरात ठेवण्याची प्रथा चीनमध्ये चौथ्या शतकापासून नोंदवली गेली आहे. भारतीय संस्कृतीचा विचार केला तर आपल्या प्राचीन शिल्पकलेत, चित्रकलेत आणि लोकसाहित्य परंपरेत पशु–पक्ष्यांचे भरपूर उल्लेख आणि चित्रण आहे. पशु–पक्ष्यांकडे आपल्या भोवतालच्या चराचरातील एक घटक म्हणून आदरपूर्वक पाहणे ही आपली संस्कृती आहे. अन्न–वस्त्र व निवाऱ्याच्या गरजा भागवणाऱ्या निसर्गातील प्रत्येक घटकाबद्दल आपण कृतज्ञता व्यक्त करत आलो आहोत. अनेक आदिवासी आणि हिंदू धर्माच्या परंपरेत पशु–पक्ष्यांना देवत्व दिलेले दिसते. प्राण्यांमध्ये स्वतःला पाहण्याची मानवी प्रवृत्ती जुनी आहे. पण गेल्या शतकात याच प्रवृत्तीचे झपाट्याने व्यावसायीकरण होत गेले. प्राण्यांना आपल्या व्यक्तिगत, कौटुंबिक जगण्याचा भाग बनवताना आपण प्राणी पाळणे ते प्राण्यांचे पालक होणे हा बदल सहज स्वीकारला. या बदलाची समाजशास्त्रीय कारणमीमांसा होणे आवश्यक आहे. आज पाश्चिमात्य जगात प्राणी–मानव सहसंबंधावर आंतर–विद्याशाखीय दृष्टीकोनातून भरपूर संशोधन होत आहे. एखाद्या समाजाच्या सांस्कृतिक स्मृती व वारशाचा महत्वाचा भाग म्हणून पशु–पक्ष्यांच्या स्थानाचा अभ्यास केला जात आहे. भारतीय संदर्भात माणूस आणि प्राणी यांच्यातील साहचर्याच्या सामाजिक सांस्कृतिक इतिहासाचा आढावा घेणे हा एक महत्वाचा समाजशास्त्रीय संशोधनविषय होऊ शकतो.

**बदलती समाजव्यवस्था व माणूस आणि प्राणी यांच्यातील संबंध:** प्राण्यांच्या मानवीकरणाचा थेट संबंध आजच्या समाजव्यवस्थेशी आहे. आजच्या समाजव्यवस्थेत व्यक्तीचे स्वातंत्र्य, स्वायत्तता या गोष्टी खुप महत्वाच्या आहेत. विवाह आणि कुटुंब व्यवस्थेत अमुलाग्र बदल होतायत आणि व्यक्तिकेंद्रित व्यवस्थेचे फलस्वरूप एकटेपणा, स्पर्धा, आणि तणाव या गोष्टींचा सामना व्यक्तींना करावा लागतोय. दुर्खीमच्या सैद्धांतिक चौकटीतून बघायचे तर आजूबाजूच्या समाजाशी असलेले व्यक्तींचे संबंध तुटक होत आहेत. समाजमाध्यमांच्या युगात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण म्हणाल तर सतत एकमेकांच्या संपर्कात असतो. पण खऱ्या अर्थाने एकेकटेच जगत असतो. अमेरिका, युरोपमध्ये झालेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे कि निस्वार्थी प्रेम, माया, सोबत, निखळ मैत्री या मुलभूत मानवी गरजा भागवण्यासाठी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा प्राण्यांना प्राधान्य देत आहेत. न्युयॉर्क सारख्या शहराचा उल्लेख 'petropolis' असा केला जातो कारण अमेरिकेतील २/३ कुटुंबात पाळीव प्राणी आहेत. फेर्दमान (२०१४) यांनी केलेल्या संशोधनानुसार अमेरिकेतील घटत्या जन्म–दराचा आणि लहान आकाराचा कुत्रा पाळण्याच्या वाढत्या प्रमाणाचा निश्चित सह–संबंध आहे. ज्या स्त्रियांना मूल नको आहे किंवा बाळंतपण लांबवायच आहे अशा स्त्रिया लहान कुत्रा अगदी आपल्या मुलाप्रमाणे सांभाळतात असे या कुटुंबांच्या अभ्यासातून त्यांना दिसून आले. अडचणीच्या काळात घरातील पाळीव प्राणी (प्राधान्याने कुत्रा) हा खूप मोठा आधार व तणाव कमी करण्याचे साधन असते असेही संशोधनातून दिसून आले आहे. मानवी सहसंबंध प्रस्थापित करण्यापेक्षा पाळीव प्राण्याबरोबर जवळकीचे नाते निर्माण करण्याकडे कल दिसून येतो आहे. वेगाने वाढणारे शहरीकरण, विभक्त कुटुंब, एकेकट्या राहणाऱ्या व्यक्तींचे वाढते प्रमाण, जागतिक लोकसंख्येतील जेष्ठ नागरिकांचे लक्षणीय प्रमाण अशी ठळक वैशिष्ट्ये असणाऱ्या युगात माणसांच्या रिकाम्या जागा प्राणी भरून काढत आहेत. माणसांनी एकमेकांच्या भागवायच्या सामाजिक व भावनिक गरजा प्राणी भागवतायत. किंबहुना मानवी सहसंबंधांचे व आंतर–क्रियांचे जाळे म्हणजे समाज अशी समाजशास्त्रीय संकल्पना आहे. या सहसंबंधांत प्राणी कितपत आणि कशा प्रकारे सामावले गेले आहेत या मुद्द्याचा समाजशास्त्रीय दृष्टीने विचार होणे फार गरजेचे आहे. पाळीव प्राण्यांची वाढती संख्या आणि त्यांच्या मानवीकरणाचे लक्षणीय प्रमाण बघता आपल्या मानवी समाजाविषयीच्या तसेच कुटुंबव्यवस्थेविषयीच्या मुलभूत धारणा विस्तारण्याची गरज निश्चित आहे. हे बदल फक्त पाश्चिमात्य जगात घडतायात अशा भ्रमात न राहता भारतातही प्राण्यांच्या वाढत्या मानवीकरणाच्या प्रक्रियेकडे डोळसपणे बघण्याची आवश्यकता आहे.

समाजशास्त्रातील मुलभूत संशोधनानुसार स्व ची निर्मिती ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. व्यक्तीच्या जडणघडणीत कुटुंबातील सदस्य, मित्र, सोबती, कामावरील सहकारी अशा विविध स्तरातील व्यक्तींचा सहभाग असतो. समाजात मिळणाऱ्या आर्थिक व भौतिक लौकीकाचाही स्व प्रतिमेच्या निर्मितीत महत्वाचा वाटा असतो. उत्तर–आधुनिक समाजात एकीकडे व्यक्ती आणि समाज यांच्यातील समायोजनात मोलाची भूमिका बजावणाऱ्या प्राथमिक संस्थांचा ऱ्हास

ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS POONA-411001

होत असताना दुसरीकडे सतत बदलत्या आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक व्यवस्थेत दैनंदिन जीवन अस्थिर व अनिश्चित स्वरूपाचे होत चालले आहे. लग्न, मुलंबाळ, कामातील यश, प्रगती अशा गोष्टींपेक्षा आपल्या आयुष्यातील पाळीव प्राणी हा व्यक्तीला स्वत:च्या असण्याचा महत्वाचा घटक वाटतो. पाळीव प्राण्याला नुसते सोबती नाही तर स्वत:चाच एक भाग असल्याप्रमाणे वागवण्याच्या या प्रक्रियेकडे संशोधक 'स्व'– विस्ताराची प्रक्रिया म्हणून बघतात (बेल्क १९८८, मॉस्टेलर २००८, गॅडबरी व व्हाईट २०१३). आपल्या आयुष्यात एका प्राण्याचे असणे आणि त्याच्या सोबत राहता येणे ही जीवनाची पूर्तता आहे अशी भावना निर्माण होणे, किंवा व्यावहारिक पातळीवरील भौतिक सुखाच्या पलीकडे जाणार समाधान पाळीव प्राण्याच्या सहवासातून मिळत अशी भावना होणे यातून प्राण्याचे मानवीकरण अगदी सहज वाटायला लागते. सूक्ष्मदर्शी समाजशास्त्रीय दृष्टीकोनानुसार रोजच्या दैनंदिन व्यवहारातून व्यक्तींचे आयुष्य घडत असते. आपल्या रोजच्या जगण्यातील छोट्या छोट्या गोष्टीतून आपली ओळख, समाजातील स्थान निर्देशित होत असते. पाळीव प्राणी बाळगणे, एखाद्या लहान मुलाप्रमाणे त्याला वागवणे, त्याच्यासाठी वेगवेगळ्या वस्तू खरेदी करणे या सर्व गोष्टींमधून व्यक्ती आपली सामाजिक ओळख निर्माण करत असतात असेही संशोधकांचे म्हणणे आहे. याच गोष्टीकडे व्यापक संरचनेच्या दृष्टीकोनातून पाहिले तर प्राण्यांचे सामाजिक स्तरीकरणात असलेले स्थान स्पष्ट होते.

**प्राण्यांचे मानवीकरण आणि सामाजिक विषमता:** सामाजिक विषमता हे मानवनिर्मित समाजव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य आहे. प्राण्यांना ओढून आपल्या समाजात बसवताना माणसाने त्यांच्यावरही सामाजिक विषमता लादली आहे. काही प्रजाती 'विशुद्ध' व 'उच्च', त्यांच्या संकरातून निर्माण केल्या गेलेल्या प्रजाती अनोख्या म्हणून आणखी उच्च तर देशी प्रजाती सर्वसामान्य अशी श्रेणीबद्ध उतरंड पाळीव प्राण्यांमधेही निर्माण केली आहे.

बोर्दुयू यांनी त्यांच्या 'Distinction' (१९८४) या ग्रंथात असे प्रतिपादन केले आहे की सामाजिक विषमता टिकवून ठेवण्यात सांस्कृतिक व्यवस्थेचा खूप मोठा वाटा असतो. अभिजन वर्गाकडे आपल्या उच्च सांस्कृतिक अभिरुचीचे हमखास वापरता येईल असे शस्त्र असते. खानपान, कला, क्रीडा, मनोरंजन अशा सर्व क्षेत्रातील श्रेष्ठ दर्जाची अभिरुची ही त्यांना समाजातील सामान्य व गरीब स्तरातील लोकांपेक्षा पटकन वेगळे करून त्यांचे समाजातील उच्च स्थान दर्शविते. बोर्दुयू यांच्या मते उच्च अभिरुची ही उच्चभ्रू वर्गाची सांस्कृतिक निशाणी असते. समाजातील आपले स्थान अधोरेखित करण्यासाठी उच्च, अभिजन वर्गातील लोक नेहमी अभिरुची आणि रुचीपूर्ण निवड या दोन गोष्टी सांस्कृतिक भांडवल म्हणून वापरतात, किंबहुना त्यांच्याकडे असलेल्या आर्थिक भांडवलाइतकेच त्यांचाकडे असणारे सामाजिक व सांस्कृतिक भांडवल महत्वाचे असते. या भांडवलाच्या आधारे त्यांची अधिसत्ता टिकून राहते. पाळीव प्राण्यांशी संबधित निवड आणि निकष या सांस्कृतिक भांडवलाचाच एक प्रकार आहे. पाळीव प्राण्यांशी संबधित निवड आणि निकष प्राणी पाळणाऱ्यांच्या सामाजिक दर्जा व स्थानाशी निगडीत आहेत. श्रीमंत उच्च वर्गातील घरात 'उच्च' व 'pure' प्रजातीच्या प्राण्यांना प्राधान्य दिले जाते. लॅब्राडॉर, गोल्डन रीट्रीवर, हस्की, रोटवायलर अशा एकापेक्षा एक मुद्दाम संकरीत केलेल्या प्रजाती बाजारपेठेत उपलब्ध आहेत. अशा प्रजातीचा कुत्रा किंवा मांजर खूप जण पाळत असले तरी बोर्दुयू म्हणतात त्याप्रमाणे, प्राणी पाळण्यातील आपल्या विशिष्ट अभिरुचीतून उच्चभ्रू वर्ग एक पायरी पुढेच राहतो कुत्र्याला खायला देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या भांड्यांपासून व मुद्दाम तयार करवून घेतलेल्या अन्नापासून ते प्राण्यांचे प्रदर्शन शो आयोजित करून त्याला प्रतिष्ठित वलय मिळवून देण्यापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश यात होतो.

**प्राण्यांचे मानवीकरण आणि निसर्गातील हस्तक्षेप:** प्राण्यांना आपल्या सामाजिक वास्तवाचा भाग करून घेताना उच्च–नीच प्रतिष्ठेच्या खोट्या संकल्पना आपण त्यांच्यावरही लादल्या आहेत हा दुर्दैवाचा भाग लक्षात घेतला पाहिजे. आपल्या देशी वाणाच्या कुत्र्यासाठी वापरले जाणारे 'गावठी' हे संबोधन प्राणी–जगतावर आपण लादलेल्या सामाजिक विषमतेचेच द्योतक आहे. गावठी वाणाचे प्राणी पाळले तर पुढे त्यांच्या पिल्लावळीला मागणी नाही म्हणून शस्त्रक्रिया करून त्यांची प्रजननक्षमता कृत्रिमरीत्या खुंटवून टाकली जाते. दुसरीकडे उच्च प्रजातीच्या प्राण्यांचा समागम मुद्दाम घडवून आणला जातो आणि त्यासाठी प्रतीक्षा यादी असते. खोट्या प्रतिष्ठेच्या कल्पनांच्यापायी निसर्गचक्रात वाटेल तसा हस्तक्षेप करून 'टेलरमेड' प्राणी बनवून घेतले जातात. प्राणी पाळण्याच्या नावाखाली आपण निसर्ग चक्रात भयानक ढवळाढवळ करत आहोत. प्राण्यांच्या मानवीकरणाच्या नादात एकीकडे त्यांच्या निसर्गदत्त शक्तींचा व्यय होतोय व दुसरीकडे आज माणसाने आपल्या जीवनशैलीमुळे ओढवून घेतलेले आजार प्राण्यांच्याही मागे लागतायत. याचा नैसर्गिक आणि सामाजिक पर्यावरणावर कसा परिणाम होत आहे हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

सेर्पेल या पशुवैद्यकशास्त्रज्ञाने लिहिलेल्या 'In the company of animals' (१९८६) या पुस्तकात त्यांनी याच अनुषंगाने अनेक मुलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते मानवीकरणाच्या नावाखाली आपण फक्त ठराविक पाळीव प्राण्यांसोबत जगतोय, तेदेखील या प्राण्यांना त्यांच्या नैसर्गिक जगापासून तोडून. आपापल्या छोट्या उबदार जगात आपल्या पाळीव प्रण्यासोबत जगताना बाकीच्या नैसर्गिक जगाचे व सृष्टीचे आपले आकलन उलट कमी कमी होत चाललेय. इतर असंख्य प्रजातींचा विकासाच्या नावाखाली विनाश होत आहे याचे आपल्याला भान उरलेले नाही. पाळीव प्राण्यांच्या मानवीकरणाकडे भांडवलशाही विकासव्यवस्थेतील अंतर्विरोध म्हणून गांभीर्याने बघितले गेले पाहिजे.

**समारोप:** पाळीव प्राण्यांचे मानवीकरण हा बदल वरवर दिसतो तितका सोपा नाही. या विषयाच्या सामाजिक पैलूंच्या चर्चेतून त्यातील गुंतागुंत स्पष्ट होते. प्रस्तुत लेखात मांडलेल्या मुद्द्यांव्यतिरिक्त या विषयाला इतरही अनेक कंगोरे आहेत. त्या सर्वांची सविस्तर मांडणी इथे शक्य नसली तरी त्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. वैज्ञानिक व शैक्षणिक संशोधनासाठी प्राण्यांचा वापर, प्राण्यांना दिली जाणारी क्रूर वागणूक, जाहिरात, सिनेमा किंवा इतर व्यावसायिक हेतूंसाठी प्राण्यांचा वापर, प्राण्यांचे हक्क, प्राण्यांचे कल्याण, त्यासाठीची चळवळ आणि राजकारण,



ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA-411001

साहित्य आणि लोकप्रिय संस्कृतीतील प्राण्यांचे चित्रण, शाळा, धार्मिक संस्था, प्रसारमाध्यमे अशा सामाजीकरणाच्या संस्थांद्वारे प्राण्यांसंबंधी बिंबवले जाणारे विचार.

पाळीव प्राण्यांच्या मानवीकरणाच्या चर्चेत प्राण्यांना दिल्या जाणाऱ्या प्रेमळ व लाडाच्या वागणुकीचाच विचार होणे साहजिक असले तरी या लेखाच्या निमित्ताने मानवी इतिहासाच्या बदलत्या टप्प्यांवर प्राण्यांचा वापर वचक ठेवण्यासाठी, जरब बसवण्यासाठी, प्रसंगी मुडदे पाडण्यासाठी केला गेला आहे याची आठवण ठेवणे आवश्यक आहे. माणूस आणि प्राणी यांच्यातील संबंध खऱ्या अर्थाने साहचर्याचे हवे असतील तर ते केवळ माणसाच्या सोयीप्रमाणे व फायद्याप्रमाणे असून चालणार नाही. प्राण्यांकडे एक सोबती म्हणून बघण्याची प्रक्रिया एकप्रकारे आत्मभान देणारी प्रक्रिया असली पाहिजे. संपूर्ण सृष्टीचा विचार केला तर 'माणूसपण' हा अस्तित्वाचा केवळ एक प्रकार आहे, एक अवस्था आहे. 'प्राणीपण' हि तितकीच महत्वाची व स्वतंत्र अवस्था आहे. अस्तित्वाच्या वैविध्यपूर्ण शक्यतांचा स्वीकार व आदर करणे हेच संपूर्ण माणूस बनण्याचे लक्षण आहे.

*References*

1. *Gadberry, J. H., White R., (2013), Companion animals: A social history of Anthropomorphism, International Journal of Social Science Research.*
2. *Forbes, Trafford and Surie, (2018), Pet Humanisation: What is it and Does it Influence Purchasing Behaviour, Journal of Dairy and Veterinary Sciences, 1&5.*
3. *Serpell James, (2002), Anthropomorphism and Anthropomorphic Selection—Beyond the ÞCute Response, Society and Animals, 437&454*

# स्त्री अत्याचार : कारणे, परिणाम व ऊपाय

*डॉ. **निसर्गंध सिद्धार्थ**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, सर सय्यद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.*

*__गोषवारा:__ स्त्री हा कोणत्याही समाजाचा अविभाज्य घटक असतो. स्त्रीशिवाय समाजाचा सर्वसमावेशक विकास अशक्य आहे. त्यामुळे स्त्री घटकाचा विकास अपरिहार्य आहे. मात्र, भारतातील पुरोगामी महाराष्ट्रात स्त्री संबंधीच्या गुन्हाचे स्वरुप 'हायटेक' बनले आहे. हुंडाबळी, भ्रुणहत्या, प्रेमभंगातून हत्या, बलात्कार, सामुहिक बलात्कार, ऑनर किलींग, पोर्नग्राफी कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रमाणात तीव्र वाढ झाली आहे. स्त्रियांवरील अत्याचाराची वाढती आकडेवारी, स्त्रियांचे शोषण, दुयमत्व हे जाती व्यवस्था, वर्ग व्यवस्था, पितृसत्ता, स्त्रीयांप्रती बुरसटलेल्या दृष्टिकोनाच्या पायावर उभी आहे. हे शोषण दृढ करण्यासाठी स्त्रियांचा वारंवार वापर केला जातो. त्याचेच उदाहरण म्हणजे खैरलांजी, सोनई, जवखेडा, कोपर्डी व सद्य:स्थितीतील औरंगाबाद आहे. महाराष्ट्रातील स्त्री अत्याचाराचे समूळ उच्चाटन होण्यासाठी सुशिक्षित स्त्री समाज व पुरुषांचा स्त्रियांप्रती बुरसटलेला दृष्टिकोन बदलण्याची आणि महिला वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणाची गरज आहे.*

***मुख्य शब्द:*** *महाराष्ट्र, स्त्री, अत्याचार, वास्तवीकता, कारणे, परिणाम, उपाय.*

**प्रस्तावना:** जगातील कोणत्याही राष्ट्राचा जलद, चिरंतन व सर्वसमावेशक विकासासाठी समाजातील सर्व घटकांचा पर्याप्त विकास होणे गरजेचे आहे. त्यातही स्त्री वर्गाचा विकास अपरिहार्य आहे. कारण, स्त्री हा कोणत्याही समाजाचा अविभाज्य घटक असतो.. परंतु स्त्री या घटकावर विविध मार्गाने, विविध प्रकारे अत्याचार केले गेले व केले जात आहेत. जागतिकीकरणानंतर या अत्याचाराच्या प्रकारात मोठया प्रमाणात बदल झाले आहे. त्यामुळे स्त्री अत्याचाराची दाहकता फक्त राष्ट्रापुरतीच मर्यादित नसून ती वैश्विक पातळीवर देखील पाहावयास मिळते. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राचा विचार केला तर सर्वांच्या डोळयांसमोर दिल्लीचे निर्भया प्रकरण समोर येते. या प्रकरणानंतर संपूर्ण राष्ट्र स्त्री अत्याचाराच्या विरोधात ऊभा राहिला. फक्त काही काळ. यानंतरही अत्याचाराच्या प्रमाणात वाढ झाली आहे. भारतात केवळ ३४.४ टक्के गुन्हयांच्या केसेस नोंदविले जातात आणि त्यातही केवळ सुशिक्षित आणि मध्यमवर्गीयाद्वारेच गुन्हे नोंदविले जातात. म्हणजेच ६५ टक्क्यांच्या जवळपास गुन्हे नोंदविलेच जात नाहीत. निम्न मध्यमवर्गीय आर्थिक अभावग्रस्तामुळे गुन्हे नोंदवित नाहीत. ऊच्च मध्यमवर्गीय आर्थिक ताकदीवर गुन्हे पचवितात म्हणून केवळ ३४.४ टक्के गुन्हे नोंदविले जातात, म्हणजेच स्त्री संबंधी नोंदविल्या जाणाऱ्या गुन्हयांची संख्या ही हिमनगाप्रमाणे अत्यंत छोटा भाग दृश्य आहे. स्त्रियांविषयी समाजात असणारी धारणा तिच्यावर होणाऱ्या प्रत्येक अत्याचाराला खतपाणी घालते. स्त्रीदास्याची अखंडितता व सातत्य यामध्ये हिंसेची भूमिका राहिलेली आहे. स्त्रियांवर होणारी सामुदायिक हिंसा ही जात–जमातीवर पुरुष सत्ता प्रस्थापित करते आणि त्यासाठी तिच्या देहाचा वापर होतो. महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हयातील कोपर्डीच्या घटनेतही सामुदायिक शक्तीचा वापर करून या निर्भयाचा देहाची विटंबना करण्यात आली. कायद्याचा नसलेला धाक, त्यातल्या पळवाटा, शोषीत मुलीने गुन्हयाची वाच्यता करू नये म्हणून तिचे भौतिक अस्तित्व संपवण्याचा प्रकार आज महाराष्ट्रातील समाजाला कुठल्या स्तरावर घेऊन चालला आहे याचा अंतर्मुख होवून समाजाने विचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळेच संशोधकाने प्रस्तुत शोध निबंधात महाराष्ट्रातील स्त्री अत्याचाऱ्यांच्या वास्तविकतेचा, कारणांचा व परिणामांचा शोध घेऊन स्त्री अत्याचाराच्या समूळ उच्चाटणासाठी ऊपाय सुचविले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** १. महाराष्ट्रातील स्त्री अत्याचाराबाबतची स्थिती अभ्यासणे. २. स्त्री अत्याचारामागील कारणांचा व परिणामांचा शोध घेणे. ३. स्त्री विकासात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भूमिका तपासणे. ४. स्त्री अत्याचाराच्या समूळ उच्चाटणासाठी ऊपाय सूचविणे.

COLLEGE FOR GIRLS POONA